# महाराणा प्रताप विद्यालयात दीक्षांत समारंभ

जळगाव, ता. १३ : येथील महापालिकेच्या महाराणा प्रताप विद्यालयात एम्को फाउंडेशनतर्फे आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित परिवर्तन व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण कार्यशाळेंतर्गत दीक्षांत समारंभ नुकताच झाला. कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार विद्याधर पानट यांच्या हस्ते प्रशिक्षण वर्गातील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. कार्यशाळेत घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांनाही पारितोषिके देण्यात आली. प्रसाद सोनवणे, सुपडू जोगी, स्वप्नील जोशी, चुनिलाल राठोड यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी अशोक खिंवसरा, प्रमोद खिंवसरा, अजित कुचेरिया, डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, प्रशिक्षक नितीन नंदागवळी, श्रीकांत मिश्रा आदी उपस्थित होते. एम्को फाउंडेशनचे प्रमुख रामास्वामी यांनी प्रास्ताविक केले. सीमा खरे यांनी आभार मानले.



जळगाव : महाराणा प्रताप विद्यालयात आयोजित परिवर्तन व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण कार्यशाळेतील यशस्वी विद्यार्थ्यांसह मान्यवर.